# सीएसएमटी ग्रँटरोड मेट्रो वेगात




**मुंबई (प्रतिनिधी):** मुंबईची वाहतूक कोंडी फोडण्यासाठी मुंबईत मेट्रो रेलचे जाळे झपाट्याने पसरत आहे. सीएसएमटी ते ग्रँटरोड मेट्रो प्रकल्पाचे काम जोरात सुरू असून लवकरच पूर्ण होईल, अशी माहिती मेट्रो फेस ३ च्या अधिकाऱ्याने दिली. मेट्रो फेस-३ च्या कामाची माहिती मुंबईकरांना कळावी, या उद्देशाने पत्रकारांसाठी विशेष आयोजन करण्यात आले होते.

घाटकोपर-वर्सोवा ही पहिली मेट्रो मुंबईकरांच्या सेवेत दाखल झाली. गारेगार व जलद प्रवास यामुळे प्रवाशांचा मेट्रो रेलला चांगलाच प्रतिसाद मिळाला. मुंबईतील वाहतूक कोंडी पाहता मेट्रो व मोनोरेलसारख्या प्रकल्पाची गरज लक्षात घेता वेगाने हे काम हाती घेण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून सीएसएमटी ते ग्रँटरोड मेट्रो प्रकल्पाचे काम जोरात सुरू असून लवकरच हे काम पूर्ण होईल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.